विभाग नं :— **सरकारी किंमत :— /—**

खरेदीची किंमत **मुद्रांक शुल्क — /—**

।। खरेदीखत ।।

मौजे धुळे ता. जि. धुळे येथील देवपूर महानगरपालिका हद्दीतील गट नं. ५३ पैकी प्लॉट नं. ९१ सी.टी.एस नं. ७३२७ मधील "श्री. श्री. बालाजी पॅलेस" अपार्टमेंट या रहिवासी मिळकतीमधील ———————————— वरील फ्लॅट नं. ———— या मिळकतीची किंमत रू.————————/— अक्षरी ———————————————— ———————————— मात्रचे दि. / /२०२१ रोजीचे खरेदीखत.

१. ————————————————————

वय — वर्षे, धंदा —

पॅन नं.—

मो.नं.

२. ————————————————————

वय— वर्षे, धंदा —

पॅन नं.—

मो.नं.

दोन्ही रा. ..लिहुन घेणार

आणि

श्री. दिनेश भटू फुलपगारे

उ.व. ५५ वर्षे व्यवसाय — व्यापार

पॅन नं.— AAEPF5463G

रा.ग.द.माळी हौ. सोसायटी प्लॉट नं. ३५ ब देवपूर धुळे

लिहून देणार

कारणे कायमचे खरेदीखत लिहुन देणार लिहून देतात ते येणेप्रमाणे,

१) **<u>मिळकतीचे वर्णन</u>** :— मौजे धुळे ता.जि.धुळे धुळे महानगरपालिका हद्दीतील देवपुर गट नं. ५३, ही जमीन मे. कलेक्टर सो. जि. धुळे यांचे कडील ऑर्डर नबंर सी.टी.एस/डब्ल्यु एस/४०८/एन.ए.एस.आर. तारीख २७/०३/१९६७ अन्वये बिनशेतीकडे वर्ग झाली असून त्या प्लॉटस पाडण्यात आलेले आहेत. त्या मंजूर झालेल्या प्लॅन प्रमाणे रहिवास प्रयोजनार्थ वर्ग झालेले गट नं. ५३ मधील प्लॉट नं. ९१ सी.टी.एस नं. ७३२७ मधील "श्री. श्री. बालाजी पॅलेस" अपार्टमेंट या रहिवासी मिळकतीमधील ———————————— मजल्यावरील फ्लॅट नं. ———————— याचे एकुण क्षेत्र ———————————— चौ.मी. यात २ बी. एच.के / १ बी.एच.के रूम, शौचकूप, बाथरूम, एक बाल्कनी, मिळकतीस वीज मिटर कनेक्शन, नळपाणी कनेक्शन, जिचे सविस्तर वर्णन परिशिष्ठ ब मध्ये केलेले आहे. व जिचा उल्लेख पुढे सोयीसाठी सदरील मिळकत असा केला आहे.

२) सदरील मिळकत हि पांडूरंग गोंविदराव देवरे यांचे स्वतंत्र मालकीची असून त्यांचेतर्फे श्री. दिनेश भटू फुलपगारे त्यांचे जनरल मुखत्यार व डेव्हलपर लिहून देणार यांनी ती विकसित केली आहे. त्यासाठी दि.०९/१२/२०१९ रोजी विकसन करारनामा व जनरल मुखत्यारपत्र लिहून देणार यांचे लाभात करून दिलेले आहे. अशा उपरोक्त नमुद वर्णनाची आमच्या ताबे उपभोगातील वहिवाटीतील मिळकतीचा ले आउट प्लॅन मंजुर झालेला आहे. सदर गट नं. ५३ मधील प्लॉट नं. ९१ सी. टी.एस नं. ७३२७ मधील "श्री. श्री. बालाजी पॅलेस" अपार्टमेंट या नावाने बांधलेले असुन सदरची इमारत संपुर्ण आर.सी.सी फ्रेमवर्क मध्ये बांधण्यात आलेली आहे. सदर बांधकामास धुळे महानगरपालिका धुळे यांचे कडील परवानगी नं. २३०३ दि. २८/११/२०१९ रोजी मिळालेली आहे.

३) सदरील मिळकत ही लिहून देणार यांना तबदिल करावयाची असल्याने व लिहून घेणार यांना सदरील मिळकत खरेदी करावयाची असल्याने उभय पक्षात चर्चा होवून खरेदीचा व्यवहार रक्कम रूपये ————————————————/—

(रूपये ———————————————— मात्र) इतक्या रक्कमेस निश्चित झाला. त्यानुसार लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालीलप्रमाणे भरणा रक्कमा दिलेले आहेत. सदरहु भरणा रक्कमा मिळाल्याबद्दल लिहून देणार यांची काहीएक तक्रार राहिलेली नाही. सदरहु मिळकतींचे मोबदला म्हणुन लिहून देणार यांना मिळालेला भरणा तपशिल मिळाला तो येणेप्रमाणे

रू. ————————————/— (अक्षरी ———————————————— रूपये मात्रचा) र.रू. ———————————————— यांचे खाते

असलेला ——————————————————

शाखा :— ——————————————————

— धनादेश क्र. ——————————————————

चा दिनांक ——————————————————

रोजीचा धनादेश ——————————————————

यांच्या नावे मिळाला. धनादेश मिळाल्याबाबत तक्रार राहिलेली नाही.

रू. ——————————/— (अक्षरी र.रू.

—————————————— रूपये मात्रचा)

—————————————— यांचे खाते

असलेला ——————————————————

शाखा :— ——————————————————— —

धनादेश क्र. ——————————————— चा

दिनांक ——————————————————— रोजीचा

धनादेश ——————————————————

यांच्या नावे मिळाला. धनादेश मिळाल्याबाबत तक्रार राहिलेली नाही.

.....

रक्कम रूपये ——————————————————/— एकुण अक्षरी

—————————————— रूपये मात्र भरणा मिळाला, भरणा बद्दल व किंमती बद्दल तक्रार नाही.

४) वर नमुद भरणा तपशिलाप्रमाणे लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना संपुर्ण खरेदीखताची मोबदला रक्कम अदा केली आहे. संपुर्ण मोबदला रक्कम मिळाल्याबाबत लिहून देणार यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. तसेच सदरील मिळकतीच्याबाबातचे अन्य चार्जेसपोटी लिहून देणार यांना लिहून घेणार यांचेकडून आता कोणतीही रक्कम येणे बाकी नाही. सदर मिळकतींचे या खरेदीखताने लिहून घेणार हे संपुर्णपणे मालक झालेले आहेत.

५) आज या खरेदीखताने लिहून देणार यांनी खरेदी मिळकतीचा म्हणजे अपार्टमेंटमधील ———————————— मजल्यावरील फ्लॅट नं. ———————————— चा ऐनजिनसी ताबा दिला आहे. त्याचप्रमाणे फ्लॅट मिळकतीतील सर्व हक्क सोयी सुविधांसह त्याचप्रमाणे अपार्टमेंट मधील कॉमन पॅसेज, जिना, लॉबी व अन्य सर्व सामाईक सुविधामध्ये असणारे अविभक्त हक्क व अधिकार आज रोजी लिहून घेणार यांना मालकी हक्काने दिले आहेत. त्याचप्रमाणे सदर फ्लॅट मिळकतीमध्ये लिहून देणार यांना जे जे मालकी हक्क तसेच इतर तदानुषंगिक हक्क दि.०९/१२/२०१९ रोजीचे दस्त नं. ८६०/२०१९ या विकसन करारनाम्याने प्राप्त झाले आहेत ते ते सर्व हक्क या खरेदीपत्राने लिहून घेणार यांना दिलेले आहेत व त्यावरून व त्यांना प्राप्त झालेल्या हक्कावरून हे खरेदीखत तुमचे लाभात करून दिले आहे.

सदरची संपुर्ण मिळकत महाराष्ट्र ओनरशिप ॲक्ट १९७० अन्वये रितसर कायदेशीर करण्यात आलेली असुन सदर मिळकतीबाबतचे डिक्लरेशन डिड हे दि. ३०/१२/२०२० रोजी मे.दुरयम निबंधक सो धुळे २ यांच्या कडील दस्त नं. ४७९७/२०२० अन्वये नोंदविलेले आहे.

६) आता तुम्ही या फ्लॅटचे सर्व सामाईक सुख व सोंयींचे या कायम खरेदीपत्राने मालक व उपभोगदार झाले असून सदर मिळकतीवर आमचा अगर आमचे वाली वारसांचा कोणत्याही प्रकारे कसलाही हक्क वा अधीकार वा हितसंबंध राहिलेला नाही. आजपासून पुढे तुम्ही सदर मिळकतीचे सर्व सामाईक सुख व सोंयींचा उपभोग मालकी हक्काने पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने निरंतरपणे उपभोग घेवू शकतात अगर मर्जीनूरूप सदर मिळकतीची व्यवस्था, हस्तांतरण, तबदीली वा विक्री करू शकतात, यास आमची अगर आमच्या कोणत्याही वारसांची कोणतीही हरकत राहणार नाही.

७) या खरेदीपत्राने लिहून देणार असे घोषित व आश्वासित करतात की, लिहून देणार यांचा सदरील मिळकतीवर पुर्ण मालकी हक्क असून सदरील मिळकत व सदरील खरेदी मिळकत यावर अन्य कोणत्याही त्रयस्थ व्यक्तिचा कोणताही हक्क,बोजा अगर हितसंबंध नाही. सदरील खरेदीपत्र लिहून घेणार यांचे नावावर करून देण्याचा पुर्ण अधिकार लिहून देणार यांना आहे. सदरील मिळकतीवर केलेल्या बांधकामाबाबतची कागदपत्रे, उदा. मंजूर आराखडा, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र, यांच्या प्रति लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेल्या आहेत.

८) लिहून देणार यांनी सदर फ्लॅट मिळकतीचे आजपर्यतचे सर्व सरकारी, निमसरकारी कर, नगरपालिका कर, चार्जेस, एम.एस.ई.बी. चार्जेस इत्यादी अदा केलेले आहेत, आता यापुढे लिहून घेणार यांनी सदरचे कर अदा करावयाचे आहेत. सदरहू मिळकतीत असणारे वीज कनेक्शन हे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना त्यांचे नावावर हस्तांतरीत करून देणेचे आहे.

९) लिहून घेणार यांनी त्यांचे नाव मालक व कब्जेदार म्हणून सिटी सर्व्हे धुळे, धुळे महानगरपालिका व अन्य ठिकाणी लावून घेणेचे आहे. त्यासाठी

आवश्यक ते सहकार्य लिहून देणार करतील याची संपुर्ण जबाबदारी लिहून घेणार यांची राहील. तसेच वाहने लावणेसाठी बेसमेंट मध्ये जागेची व्यवस्था केली आहे. जो प्रथम येईल त्यांना पार्किंग ची जागा उपलब्ध करण्यात येईल.

१०) या खरेदीपत्राच्या रजिष्ट्रेशनचा व स्टॅप डयुटीचा संपुर्ण खर्च लिहून घेणार यांनी केला आहे.

परिशिष्ट अ

मौजे धुळे ता.जि.धुळे धुळे महानगरपालिका हद्दीतील देवपुर गट नं. ५३, ही जमीन मे. कलेक्टर सो. जि. धुळे यांचे कडील ऑर्डर नबंर सी. टी.एस/डब्ल्यु एस/४०८/एन.ए.एस.आर. तारीख २७/०३/१९६७ अन्वये बिनशेतीकडे वर्ग झाली असून त्या प्लॉटस पाडण्यात आलेले आहेत. त्या मंजूर झालेल्या प्लॅन प्रमाणे रहिवास प्रयोजनार्थ वर्ग झालेले गट नं. ५३ मधील प्लॉट नं. ९१ सी.टी.एस नं. ७३२७ मधील "श्री. श्री. बालाजी पॅलेस" अपार्टमेंट त्यासी चतु:सिमा :—

पुर्वेस	:—	३० फुटी रस्ता
पश्चिमेस	:—	स.न. ५४
दक्षिणेस	:—	प्लॉट नं. ९२
उत्तरेस	:—	प्लॉट नं. ९०

परिशिष्ट ब

मौजे धुळे येथील "श्री. श्री. बालाजी पॅलेस" अपार्टमेंट मधील ———————— फ्लोअर वरील बांधीव फ्लॅटचे नं.

———————————— चे क्षेत्र ———————————— चौ.मी. यांसी षठ:सिमा खालीलप्रमाणे:—

पुर्वेस :—

पश्चिमेस :—

दक्षिणेस :—

उत्तरेस :—

वर :—

खाली :—

येणेप्रमाणे खरेदीपत्र लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना राजीखुशीने करून दिले असे.

सही साक्षीदार

१. .....

सही लिहून घेणार

————————————

(.....)

सही लिहून देणार

२. .....

————————————

(दिनेश भटू फुलपगारे)